F/.


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई. ४०० ००१

दूरध्वनी क्र. २२६१७९६९ फॅक्स क्र. २२६९०००७

E-mail: desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**महत्त्वाचे -- स्पीडपोस्ट/ईमेलद्वारे**

का.क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र /MCM/२०१९/५१०

दिनांक:- १५ /११/२०१९

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नागपूर / अमरावती / नाशिक / औरंगाबाद.

२) मा. संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई- ४००००१.

३) मा. संचालक,
आयुष संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई- ०१.

**विषय :- सन २०१९-२० साठी केंद्र शासनाच्या National Scholarship Portal वरील व राज्य शासनाच्या Mahadbt Portal वरील अल्पसंख्यांक विदयार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीबाबत...**

तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य, मुंबई यांचेमार्फत मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या National Scholarship Portal द्वारे ( **www.scholarships.gov.in** ) **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( Merit cum Means Based Scholarship ) योजना** ऑनलाईनरित्या राबविली जाते ज्याचे State Nodal Officer म्हणून संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना घोषित करण्यात आलेले आहे. तसेच, राज्य शासनाच्या विविध विभागांच्या विविध योजना महाडीबीटी पोर्टलद्वारे (संकेतस्थळ :- **https://mahadbtmahait.gov.in** ) राबविल्या जातात.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता विद्यार्थ्यांकडून दोन्ही पोर्टलवर योजनांचे ऑनलाईनरित्या अर्ज भरुन घेण्याची व संस्थास्तरांवर अर्ज तपासणीची कार्यवाही सुरु आहे. **केंद्रशासनाच्या गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजनेचे** शै. वर्ष २०१९-२० साठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची मुदत दि.१५/११/२०१९ व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज तपासणी करण्याची अंतिम मुदत दि.३०/११/२०१९ आहे. (अधिक माहिती नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर (NSP) उपलब्ध आहे.)

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपण आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे की, **"विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल"** याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी व विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन – दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच, संस्थांनी लॉगीन आयडीमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अंतिम मुदतीपूर्वी निकाली काढावे व जर अंतिम मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले व कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याबाबतदेखील सूचित करावे.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.
(कृ.मा.प.

प्रत - यांना माहितीसाठी सविनय सादर .

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई-३२
(लक्षवेध - श्री. संजय धारुरकर, अवर सचिव )

२. मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
(लक्षवेध - श्री. सं. वा. जाधव, कक्ष अधिकारी )

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१९/ 2544
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 19 NOV 2019

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) सहसंचालक, उच्च शिक्षण,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता

२) प्राचार्य, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था अमरावती विभाग अमरावती यांना कळविण्यात येते की,उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करावी.

३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.